सातारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे हस्तांतरण करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-२०१९/ प्र.क्र.६५/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीख : १५ जुलै, २०१९

वाचा :- १) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एमईडी-२०१०/ प्र.क्र.१८७ / २०१२/शिक्षण-१, दिनांक ३ जानेवारी, २०१३.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एमईडी-२०१०/ प्र.क्र.७६(अ) / २०१०/शिक्षण-१, दिनांक ३१ जानेवारी, २०१२.

३) श्वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र. एमईडी-२०१३ / प्र.क्र.२११ /१३/ शिक्षण-१, दिनांक २२ जून, २०१८.

४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांचे क्र.संवैशिवसं/जिल्हा सामान्य रुग्णालय-
सातारा/हस्तांतरण/२०७२०/५-अ/२०१८, दिनांक २९.१२.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना :-

सातारा येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याकरीता मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या किमान निकषांनुसार नवीन वैद्यकीय महाविद्यालयाकरीता किमान ३०० रुग्णखाटांचे रुग्णालय आवश्यक सोईसुविधांसह उपलब्ध असणे आवश्यक आहे. यास अनुसरुन सातारा येथील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेले जिल्हा सामान्य रुग्णालय, सातारा, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरीत करण्याबाबत प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निकषांची पुर्तता करण्याकरीता आरोग्य विभागाच्या आधिपत्याखालील जिल्हा सामान्य रुग्णालय, सातारा हे रुग्णालय, नियोजित शासकीय महाविद्यालय सुरु करण्याकरीता वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे तात्पुरत्या स्वरुपात हस्तांतरीत करण्यास पुढील अटी व शर्ती नुसार मंजूरी देण्यात येत आहे :-

<u>अटी व शर्ती</u> :-

१. जिल्हा सामान्य रुग्णालय, सातारा व रुग्णालयाच्या परिसराची सर्व जागा ही जरी हस्तांतरीत झाली तरी इमारत व जागेचा ताबा जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांच्या नावावरच राहील. त्यात कोणताही बदल करण्यात येऊ नये.

२. जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांनी तेथील नवनियुक्त अधिष्ठाता यांचेबरोबर करार करावा व सदर करार हा फक्त ३ वर्षाच्या कालावधीकरिता असावा. त्यानंतर तो आपोआप संपुष्टात येईल. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयासाठी स्वतंत्रपणे जागा घेवून त्यावर इमारत उभी करण्याची कार्यवाही ३ वर्षाच्या आत पूर्ण करावी व करार संपण्याच्या दिवशी जिल्हा सामान्य रुग्णालय, सातारा सार्वजनिक आरोग्य विभागास चल अचल मालमत्ता तथा प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यासह परत करावे.

३. जिल्हा सामान्य रुग्णालय, सातारा या रुग्णालयाच्या इमारतीमधील जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांचे कार्यालय, प्रशासकीय कार्यालय व औषध भांडार इत्यादी कार्यालये सार्वजनिक आरोग्य विभागाकडेच ठेवण्यात यावीत. जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा त्यांच्या पसंतीने (सोईनुसार) सदर जागेची निवड करतील. जिल्हा सामान्य रुग्णालय, सातारा या रुग्णालयाच्या इमारती मधील व परिसरातील उर्वरीत सर्व जागा व इमारती करार चालू असेपर्यंत अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली राहतील.

४. अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय यांना रुग्णालयाच्या इमारतीच्या मुळ रचनेत काही फेरफार करावयाचे असतील तर त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाची (प्रशासनिक विभाग) पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या परवानगीसाठी त्यांच्या मानकांप्रमाणे जिल्हा सामान्य रुग्णालय, सातारा या रुग्णालयाच्या इमारतीमध्ये फेरबदल करणे आवश्यक असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांचेमार्फत शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन तसा प्रस्ताव शासनास सादर करावा व शासनाची परवानगी प्राप्त झाल्यानंतरच फेरबदल करावेत.

५. सध्या जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांच्या कार्यालयाचा आहरण व संवितरण अधिकारी हा जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांचे अखत्यारीत सार्वजनिक आरोग्य विभागाकडेच राहील. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी स्वतंत्र आहरण व संवितरण अधिकारी नियुक्त करावा. जिल्हा

शल्य चिकित्सक, सातारा हे जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने नियुक्त केलेला आहरण व संवितरण अधिकारी हा जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांच्याकडील प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहील.

६. नेत्र विभाग व फिरते नेत्र पथक (मोबाईल ऑप्थॅल्मीक युनिट) हे पुर्वीप्रमाणेच जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांचे अखत्यारीत राहील, त्यांचे हस्तांतरण करु नये. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकाप्रमाणे लागणारा स्वतंत्र नेत्र चिकित्सा शास्त्र विभाग, अधिष्ठाता, शासकीय महाविद्यालय यांच्या नियंत्रणाखाली राहील. जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांच्याकडील नेत्र विभाग, फिरते नेत्रपथक, अधिष्ठाता यांच्या अंतर्गत असणारा नेत्र शल्य चिकित्सा शास्त्र विभाग व राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम हे समन्वयाने काम पाहतील.

७. अपंगत्व तपासणी मंडळ, गट-अ व गट-ब अधिकाऱ्यांसाठीची वैद्यकीय मंडळे पुर्वीप्रमाणेच जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांच्या अखत्यारीत राहतील. जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांना गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय प्रमाणपत्र देताना विशेषज्ञांच्या अभिप्रायाची आवश्यकता भासल्यास नियोजित वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता हे त्यांच्या अधिपत्याखालील नेत्र रोग शल्य चिकित्सा शास्त्रक, अस्थिव्यंगोपचार शास्त्र, कान, नाक व घसा शास्त्र, औषधी वैद्यकशास्त्र, मानसोपचार शास्त्र इत्यादी विभागातील तांत्रीक तज्ञ अभिप्राय मागणीप्रमाणे व आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध करुन देतील.

८. सर्व कायदेशीर बाबीसाठी उदा. Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques (PCPNDT), Medical Termination of Pregancy (MTP), Family Planning, Medical Negligence, Epidemic act व इतर तत्सम समित्यासाठी जिल्हा समुच्चित प्राधिकारी हे जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा राहतील.

९. अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा हे प्रतिनियुक्तीने अधिष्ठाता यांचे प्रशासकीय नियंत्रणाखाली वैद्यकीय अधिक्षक म्हणून रुग्णालयाचे कामकाज पाहतील.

१०. नवीन वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वित करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने नव्याने लेखाशिर्ष सुरु करुन त्याखाली आवश्यक निधी उपलब्ध करुन द्यावा.

११. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांमध्ये आपसी सामंजस्य करारनामा झाल्यानंतर सुरक्षा, स्वच्छता, वस्त्र धुलाई, आहार इ. सेवा, वैद्यकीय महाविद्यालयामार्फत नव्याने सुरु करण्यात येतील. सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयात

उपलब्ध असलेल्या अवैद्यकीय सेवा रुग्णालयाचे हस्तांतरण झाल्यानंतर संपुष्टात येतील अवैद्यकीय सेवा चालू ठेवावयाच्या असतील तर त्याचे नियंत्रण व देयके यांची जबाबदारी अधिष्ठाता यांची राहील.

१२. स्पेशल न्युबॉर्न केअर युनिट, डायलेसीस आणि डीआयसीई हे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असल्याने या सुविधांसाठीचा नियमित तांत्रीक कर्मचारी वर्ग वैद्यकीय महाविद्यालयाचा असेल तर प्रशासकीय नियंत्रण जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांचे राहील.

१३. हस्तांतरणाच्या दिवशी जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये उपलब्ध असलेला औषधांचा साठा वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडे हस्तांतरीत करण्यात यावा व जिल्हा सामान्य रुग्णालय हस्तांतरीत झाल्यानंतर, जिल्हा सामान्य रुग्णालयातील औषधी व कंझ्युमेबल उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही अधिष्ठाता यांची राहील.

१४. जिल्हा सामान्य रुग्णालयातील गट-अ मधील एम. बी. बी. एस. अर्हताप्राप्त वैद्यकीय अधिकारी हे वैद्यकीय महाविद्यालयाकडे आवश्यकतेनुसार अपघात विभाग, वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी म्हणून प्रतिनियुक्तीने काम पाहतील.

१५. आपसी सामंजस्य करारनामा झाल्याच्या दिनांकापासून जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये सध्या कार्यरत असलेले सर्व गट-अ/ब संवर्गातील विशेषज्ञ, सार्वजनिक आरोग्य विभागाकडे कार्यरत राहतील. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने प्रस्तावीत वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी लागणाऱ्या विशेषज्ञांच्या सेवा त्यांच्याकडे इतर वैद्यकीय महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या विशेषज्ञांमधून उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी.

१६. शासन निर्णय दि. २६.०६.२०१४ मधील प्रपत्र - अ मध्ये दर्शविलेले कर्मचारी जिल्हयातील आरोग्य व्यवस्था सांभाळण्यासाठी जिल्हा मुख्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाकरीता राहतील. या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागात प्रतिनियुक्ती देऊ नये.

१७. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विविध शासकीय योजनांतर्गत कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी पुर्वीप्रमाणेच जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा यांच्या नियंत्रणाखाली राहतील.

१८. सामंजस्य करारानंतर जिल्हा शल्य चिकित्सक, सातारा व नवनियुक्त अधिष्ठाता हे आपापसांत करार करतील.

१९. गट - क व गट - ड कर्मचारी, अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय यांचे अधिनस्त ३ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन देण्यात येतील. सदरची गट - क व गट - ड कर्मचाऱ्यांची आस्थापना (प्रतिनियुक्तीच्या कालावधीत) संबंधीत रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी / मुख्य प्रशासकीय अधिकारी यांच्या थेट नियंत्रणाखाली, तसेच अप्रत्यक्षपणे अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली येतील.

२०. प्रतिनियुक्तीच्या कालावधीतील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत अदा करण्यात येईल. दरम्यानच्या काळात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जसजसे विशेषज्ञ, एम.बी.बी.एस. वैद्यकीय अधिकारी, आणि गट-ब, गट-क व गट-ड कर्मचारी उपलब्ध होतील, तसतसे प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी सार्वजनिक आरोग्य विभाग परत घेईल.

२१. जिल्हा सामान्य रुग्णालय, सातारा यांच्या अधिपत्याखालील दिव्यांग तपासणी मंडळ यानंतर अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांच्या अखत्यारीत राहिल. दिव्यांग प्रमाणपत्र देताना आवश्यकता भासल्यास अधिष्ठाता यांच्या अधिपत्याखालील नेत्ररोग शल्यचिकित्सा शास्त्र, अस्थिव्यंगोपचार शास्त्र, कान- नाक-घसा शास्त्र, औषधीवैद्यक शास्त्र, मानसोपचार शास्त्र इत्यादी विभागातील तज्ञ व त्यांना तांत्रिक तज्ञ अभिप्राय मागणीप्रमाणे व आवश्कतेप्रमाणे उपलब्ध करुन घ्यावेत. स्वावलंबन प्रणालीचे नवीन लॉगीन आयडी व पासवर्ड मिळेपर्यंत दिव्यांगमंडळ जिल्हा शल्य चिकित्सक यांचे नियंत्रणाखाली राहील.

२२. सातारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील उपलब्ध यंत्रसामग्री व जड वस्तुसंग्रह, आहे त्या स्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांना वर्ग करण्यात येईल. यापुढे त्यावरील दुरुस्ती व देखभालीचा खर्च अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांनी त्यांचे निधीतून भागवावा. या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाकडे या निधीची मागणी करता येणार नाही. ही सर्व यंत्रसामुग्री करार संपल्यानंतर चालूस्थितीत सार्वजनिक आरोग्य विभागास सुपुर्त करावी. तसेच करार संपुष्टात आल्यानंतर रुग्णालयाच्या इमारती उत्तम स्थितीत सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत कराव्यात.

२३. सातारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाचे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत येणा-या सेवा (उदा. एस.एन.सी.यु., आर.बी.एस.के., आयुष, जे.एस.एस.के. इत्यादी) व त्यासाठीचा कर्मचारी वर्ग जिल्हा शल्य चिकित्सक यांचे नियंत्रणाखाली राहतील. तथापी, या सेवांवरील तांत्रिक नियंत्रण अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांचे

असेल. जिल्हा सामान्य रुग्णालयाचे राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या रुग्ण कल्याण समित्या ३ वर्षासाठी किंवा रुग्णालय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडे असे पर्यंत स्थगित करण्यात येतील. रुग्णालयाच्या इमारती सोडून इतर इमारती उदा. निवासस्थाने, कार्यालये, आयुष इमारत इत्यादी पुर्वीप्रमाणेच जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे राहतील. तथापी, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेचे मानांकन घेण्यासाठी यातील काही इमारती आवश्यक असल्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या सल्ल्याने त्या घेता येतील.

२४. सदर करारनाम्याबाबत काही वादविवाद (Dispute) निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचा राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१०१५३५५२५३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2019.07.15 05:38:45 -07'00'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/ नागपूर.
७. संचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई.
९. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
१०. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, आरोग्य भवन, मुंबई.

११. सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर), मुंबई.
१२. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
१३. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.
१४. उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.
१५.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा.
१६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रूग्णालय, सातारा.
१७. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा.
१८.वित्त विभाग (विनियम कार्यासन), मंत्रालय, मुंबई.
१८.अवर सचिव (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१९.निवडनस्ती(आरोग्य-४), सा.आ.वि.